३८

९८८/५

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन सहावा मजला,
नवी मुंबई ४०० ६१४.

दिनांक :- 16 MAY 2000

**कार्यालयीन आदेश क्रमांक ५१**

विषय :- जादा श्रमदिन मंजुरीबाबत

संदर्भ :- श्री विभागीय बैठक [डॉ. पंजाबराव देशमुख, कृषी विद्यापीठ] दिनांक १७ मार्च २००० या कार्यवृत्तांत क्र. स्था१८/ब/सभा/अएसअे/५५७ दिनांक १० एप्रिल २०००

लेखा परीक्षणात विहित श्रमदिनापेक्षा जादा श्रमदिन घेतले गेल्यात त्यांचे मंजुरी संदर्भात संदर्भाधिन बैठकीत झालेल्या चर्चेनुसार पुढील आदेश देण्यात येत आहेत.

मंजुर श्रमदिनापेक्षा ५% पर्यंत जादा लागलेले श्रमदिन मंजुर करण्याचे अधिकार जिल्हा उपमुख्य लेखा परीक्षक यांना राहतील त्यापुढील १०% पर्यंत लागलेल्या जादा श्रमदिनाचे मंजुरीचे अधिकार विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांना राहतील मात्र या पेक्षा जादा लागलेल्या श्रमदिन मंजुरीचे अधिकार मुख्य लेखा परीक्षक यांना राहतील जादा लागलेल्या श्रमदिनाबाबत समर्थनीय कारणे असणे आवश्यक असतील तसेच जादा श्रमदिनाचे प्रस्तावातील कारणाचे बाबतीत वरीष्ठ कार्यालयाचे परिच्छेद निहाय अभिप्राय असणे आवश्यक आहे.

विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक/जिल्हा उपमुख्य लेखा परीक्षक यांनी जादा श्रमदिन मंजुर केलेल्या आदेशाची प्रत मुख्य लेखा परीक्षक कार्यालयास पाठविणेत यावी. जादा श्रमदिन मंजुर झाल्याशिवाय प्रवास देयकाचे प्रदान करण्यात येवू नये [संदर्भ:-[१] या कार्यालयाचे आदेश क्रमांक ८ दिनांक १/११/९३ व शुध्दीपत्रक क्र. स्था:३/अ/जिप/नप/जादा श्रमदिन/२४९४ दिनांक २०/११/९३]

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य नवी मुंबई

प्रत:-१] उपमुख्य लेखा परीक्षक [वरिष्ठ], स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपुर/नाशिक/अमरावती/औरंगाबाद.
२] उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा औरंगाबाद जिल्हा ~~(सर्व)~~
३] उपमुख्य लेखा परीक्षक [पंरास], स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
४] अभिलेखापाल.